# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्रमांक ८७/२०२३**

विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व अशासकीय अनुदानित /विनाअनुदानित पारंपारिक महाविद्यालये व्यावसायिक महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांना कळविण्यात येते की, सर्व संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी नॅक मुल्यांकन/पूनर्मूल्यांकन प्रक्रिया करून घेणे अत्यावश्यक आहे. याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१०/(२०/१०) विशी—३, दिनांक ०८/१०/२०१० अन्वये शासनाने आदेश निर्गमित केलेला असून त्यास अनुसरून, मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे—४११००१ यांच्या दिनांक ०३ ऑक्टोंबर २०२२ रोजीच्या पत्रास अनुसरून प्रस्तुत विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षामार्फत पत्र संदर्भ क्र. आयक्यूएसी/१४३, दिनांक १२/१०/२०२२, आणि मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,. महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. २५ जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्रान्वये संलग्नित महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन /पूनर्मूल्याकंन करून घेण्याबाबत प्रस्तुत विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षामार्फत पत्र संदर्भ क्र. आयक्यूएसी/३२५, दिनांक २८ जानेवारी, २०२३ अन्वये संलग्न महाविद्यालये यांना अवगत करून नॅक मूल्यांकन /पूनर्मूल्याकंन प्रक्रिया दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत प्रारंभ टप्प्यातील संस्था नोंदणी करून Institutional Information for Quality Assessment (IIQA) नॅक कार्यालयास सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते.

शासनाने वेळोवेळी केलेल्या निर्देशाप्रमाणे विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार या परिपत्रकाद्वारे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांना कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी नॅक मूल्यांकन/पूनर्मूल्यांकन पूर्ण केलेले नाही किंवा याबाबत प्रारंभ टप्प्यातील संस्था नोंदणी **(HEI Registration) Institutional Information For Quality Assessment (IIQA)** नॅक कार्यालयास सादर केलली नाही अशा सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांनी **दिनांक ०५/०६/२०२३** पर्यंत नॅक मूल्यांकन/पूनर्मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण केल्याबाबत किंवा नॅक मूल्यांकन/पूनर्मूल्यांकन प्रक्रियेची नॅक कार्यालयाकडे प्रारंभ टप्प्यातील नोंदणी **IIQA** पूर्ण केल्या संदर्भातील माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील कॉलेज प्रोफाईलमध्ये अद्यावत **(Uptade) न केल्यास, शैक्षणिक वर्ष २०२३—२४ करिता संबंधित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांना मंजूर असलेल्या सर्व अभ्यासक्रमांच्या (व्यावसायिक/अव्यावसायिक) प्रथम वर्ष प्रवेशास निर्बंध लागू करण्याची कारवाई करण्यात येईल याची सर्व संबधितांनी गंभीर दखल घ्यावी.**

LINK
unipune.ac.in — BOD online — login (Enter Username and Password) — Important links — Information Gathering related IIQA/NAAC

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव
शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
अतिरिक्त कार्यभार

गणेशखिंड, पुणे—४११००७)
जावक क्र. सीए/११०८ )

दिनांक — २७ मे, २०२३ )

प्रत :

मा. प्राचार्य/संचालक, प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था.